माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /३८०७/२०२५/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

अपिलार्थी	उत्तरवादी	
	जन माहिती अधिकारी तथा	प्रथम अपिलीय अधिकारी तथा
बाळासाहेब गेनबा किंगरे	शिरस्तेदार (भूमापन) उपसंचालक भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे	कार्यालय अधीक्षक उपसंचालक भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे

(सुनावणी दिनांक- १४.०७. २०२६)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि. ०८.०९.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती मिळाली नाही असे नमूद केलेले आहे. सदर द्वितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान तथा तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

माहिती अर्ज दिनांक	माहितीचा तपशील
२२.०५.२०२५	१) राज्य माहिती आयुक्त पुणे खंडपीठ यांचेकडील द्वितीय अपिल क्र.११९२/२०१९ दि.१०.०६.२०२३ च्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती. २) संबंधित सर्व माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची नावे व पत्ते ३) अर्जदारास माहिती पुरविण्या बाबत तरतुद. ४) सदर आदेशातील शासन परिपत्रक दि. १०.०६.२००८ नुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, "माहिती मिळाली नाही." त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कथन केले की, " मा. पुणे खंडपिठ यांचे आदेशानुसार क्र. १ मध्ये नमूद केलेनुसार माहिती पुरविण्याबाबत आदेशीत केले होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. "

उपलब्ध अभिलेखांच्या पाहणीतून, कार्यालय अधिक्षक (एकत्रीकरण) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.रा.) पुणे यांनी दि. ०२.०७.२०२५ च्या पत्राने माहिती अर्ज व आयोगाकडील द्वितीय अपील आदेश उपसंचालक भूमि अभिलेख पुणे प्रदेश पुणे यांचेकडे हस्तांतरीत केल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपसंचालक भूमि अभिलेख पुणे प्रदेश पुणे यांनी माहिती अर्जाला उत्तर/ माहिती दिल्याचे दिसून येत

नाही. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक उपसंचालक भूमि अभिलेख पुणे प्रदेश पुणे यांनी दि. १८.०८.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये दि. १०.०६.२०२३ रोजीच्या द्वितीय अपिलाचे अनुषंगाने अपिलदार यांना हवी असलेली माहिती ती त्यांना इकडील कार्यालयाचे स्तरावरुन पुरविणेचे मा. आयोगाचे निर्देश आहेत परंतु त्यातील माहिती ही इकडील कार्यालयात उपलब्ध नसून ती उप अधीक्षक भूमि अभिलेख हवेली यांचे कार्यालयात उपलब्ध असलेने आता जन माहिती अधिकारी उप अधीक्षक भूमि अभिलेख हवेली यांनी त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अतितात्काळ इकडील कार्यालयास उलट टपाली उपलब्ध करुन देणेचे आदेश दिल्याचे दिसून येते. वास्तवित पाहता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. २२.०५.२०२५ च्या माहिती अर्जातील विषयावर निर्णय घेणे अपेक्षित आहे. तसे न करता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडील द्वितीय अपिल आदेश दि. १०.०६.२०२३ च्या अनुषंगाने प्रथम अपील आदेश पारित करुन केलेली कार्यवाही अधिनियमातील तरतूदीशी विसंगत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सखोल विश्लेषण न करता मोघमपणे आदेश पारित केला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, उपसंचालक भुमि अभिलेख पुणे प्रदेश पुणे यांचा दि. १८.०८.२०२५ रोजीचा प्रथम अपिल आदेश रद्द करण्यात येत आहे.

प्रकरणी अपिलार्थीस माहितीचे प्रदान झाले नाही.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८)(क)(दोन) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांना या प्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहितीच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतूदीनूसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस कलम ७(६) नुसार व्यक्तीश: विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.रामाआ / ३८०७/२०२५/पुणे 4852 दिनांक - 21/10/25

रामाआ-पुणे/२०२५/NSB